कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/कोनास्प/२०२६-२७/११९८
दि.२४/०८/२०२६

कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित यंदाची कोंकणी नाटयस्पर्धा ऑक्टोबर महिन्याच्या दुस-या आठवडयापासून राजीव गांधी कला मंदिर फोंडा येथे निश्चीत करण्यात आली आहे. सदर स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणा-या सर्व नोंदणीकृत संस्थानी आपल्या प्रवेशिका दाखल करण्याची शेवटची तारीख दि. २ सप्टेंबर २०२६ ही आहे. सदर नाटयस्पर्धेचे नियम व अटी तसेच विहित नमुन्यातील प्रवेशिका कला अकादमीच्या स्वागत कक्षात विनामूल्य उपलब्ध आहेत. तसेच कला अकादमीच्या **www.kalaacademygoa.co.in** या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

इच्छुक नाटयसंस्थानी पुर्ण भरलेल्या प्रवेशिकेसोबत प्रवेशशुल्क रु.५००/-(रुपये पाचशे मात्र)व अनामत रक्कम म्हणून रु.५०००/-(रुपये पाच हजार मात्र)अकादमीकडे भरणे आवश्यक आहे. सदर रक्कम कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी रोज सकाळी १० ते दुपारी १.०० व सायं. २.०० ते ४.०० या कालावधीत स्वीकारली जाईल याची सर्व संबंधितानी नोंद घ्यावी. १८६० च्या कायद्याखाली नोंदणी व नूतनीकरण झालेल्या संस्थानाच या स्पर्धेत सहभागी होता येईल. प्रवेशिका दाखल करतेवेळी सदर संस्था नोंदणी अथवा नूतनीकरणाची साक्षांकीत प्रत व **(Xerox copy of passbook/Cancelled cheque)** सोबत जोडणे अनिवार्य आहे याची सर्व संस्थानी नोंद घ्यावी.

स्पर्धेतील सादरीकरणाचा अनुक्रम त्याचदिवशी म्हणजे दि. २ सप्टेंबर २०२६ सायं.५.०० वाजता कला अकादमीच्या कार्यालयात सर्व उपस्थित संस्था प्रतिनिधींच्या समक्ष चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल. त्यानंतर प्रवेशिका मागे घेण्यासाठी ५ दिवसांची मुदत असून या निर्धारित मुदतीनंतर प्रवेशिका मागे घेता येणार नाही. तरी या अंतिम मुदतीची नोंद घेऊन सर्व इच्छुक नाटयसंस्थानी आपल्या प्रवेशिका निर्धारित मुदतीत दाखल कराव्यात असे कला अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता,
८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र(वृत्तविभाग)